# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १६ वा ❑ भारतीय सौर दिनांक २८ माघ शके १९४७, मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत नाशिकला विश्व मराठी संमेलन

### नाशिकला साजेसे असेच चौथे विश्व मराठी संमेलन होणार-मंत्री डॉ उदय सामंत

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

नाशिक – कवी कुसुमाग्रज यांचे वास्तव्य राहिलेल्या नाशिक शहराला साजेसे असेच चौथे विश्व मराठी संमेलन होईल. त्यासाठी सर्व नाशिककरांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी पुढे यावे, असे आवाहन राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी येथे केले.

मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या आय.एम.आर.टी. सभागृहात ४ थे विश्व मराठी संमेलन आयोजनाबाबत साहित्यिकांशी संवाद साधतांना मंत्री डॉ. सामंत बोलत होते. वेळी राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे, मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले, अवर सचिव नितीन डोंगरे, उर्मिला धादवड, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, संचालक रमेश पिंगळे, नंदकुमार बनकर, अप्पासाहेब गडाख यांच्यासह साहित्यिक, कवी, लेखक आदी उपस्थित होते.

येत्या २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ या कालावधीत विश्व मराठी संमेलन होईल. या संमेलनानिमित्त तीन दिवस विविध कार्यक्रम होतील. त्यासाठी विविध समित्यांचे गठण करण्यात येईल. संमेलनादरम्यान मराठी भाषा व साहित्याचा विकास, जागतिकीकरणाच्या युगातील मराठीची



भूमिका, तंत्रज्ञानातील मराठीचा वापर, शिक्षणातील मातृभाषेचे स्थान तसेच सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन या विषयांवर विविध परिसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने व संवाद सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहेत. तसेच संमेलनात कविसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरणे, नाट्यप्रयोग, कथाकथन, पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक संवाद तसेच युवा पिढीसाठी विशेष उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. मराठी साहित्य, कला व परंपरेचे दर्शन घडविणारी विविध प्रदर्शनेही या निमित्ताने भरविण्यात येणार आहे. जागतिक स्तरावर विखुरलेल्या मराठी भाषिकांना एकत्र आणणे, मराठी भाषा व संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे तसेच नव्या पिढीत मराठीबाबत अभिमान निर्माण करणे हा या संमेलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

या संमेलनासाठी परदेशातून साहित्यिक हजर राहणार आहेत. यापूर्वीचे संमेलन पुणे येथे झाले. या संमेलनात पुस्तक आदान प्रदान हा आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात आला. या संमेलनातही हा उपक्रम व्यापक स्तरावर राबविण्यात येईल. त्यासाठी नाशिककरांनी आपले योगदान द्यावे. त्यासाठी दहा रुपये वर्गणी ठेवण्यात येईल. या संमेलनाच्या मुख्य मंडपाला कवी कुसुमाग्रज नगरी असे नामकरण करण्यात येईल. अन्य दालनांना मान्यवरांची नावे देण्यात येतील. मराठी भाषा गौरव दिन आणि ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या स्मृती दिन तसेच सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनाला विशेष महत्व असणार आहे. शहराच्या सांस्कृतिक वैभवाला साजेसा हा सोहळा ठरणार असून नाशिकची ओळख जागतिक स्तरावर अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आलेल्या सूचनांची दखल घेण्यात येईल, असेही मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले.

मराठी भाषा विभागातर्फे ३५ जणांना साहित्य पुरस्कार, विश्व मराठी संमेलनाचा साहित्य भूषण पुरस्कार व नाशिकमध्ये एक विशेष पुरस्काराचे वितरण या संमेलनात करण्यात येणार आहे. १७ फेब्रुवारी रोजी पुरस्कार्थींची नावे घोषित करण्यात येतील. संमेलन पूर्व २६ फेब्रुवारी रोजी मराठी बोलीभाषांचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे व सांगता मराठीतील प्रसिद्धी नाटक आमने-सामने याने होईल. २७ फेब्रुवारी रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या निवासस्थानापासून शोभायात्रेने संमेलनाचा प्रारंभ होणार आहे. सांयकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनापूर्वी पुरस्कार विजेत्यांबाबत परिसंवादाचे आयोजन केले आहे. २८ फेब्रुवारी रोजी मनाचे श्लोक, लोककला, चित्रपट कार्यशाळा, एआय व मराठी भाषा, वारकरी संप्रदाय साहित्यप्रकार असे नानाविध कार्यक्रम होणार असून प्रत्येक दिवशी कार्यक्रमाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असल्याचे मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले. मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस ॲड. ठाकरे म्हणाले की, विश्व मराठी संमेलन होत आहे ही नाशिककरांसाठी गौरवाची बाब आहे. संमेलनासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. यावेळी उपस्थित प्रा. सायली आचार्य, प्रा. संजीवनी पाटील, प्रा. गिरीश पाटील, विश्वास ठाकूर, पिऊ शिरवाडकर, धनंजय बेळे, श्रीकांत बेणी सतीश बोरा, प्रा. डॉ. गोरक्षनाथ पिंगळे, दिनेश पैठणकर, सुरेश पवार आदींनी विविध सूचना केल्या.

**४ थे मराठी विश्व संमेलन नाशिक कार्यालयाचे उद्घाटन**

यावेळी मंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या आवारातील मराठी विश्व संमेलन नाशिक कार्यालयाचे उद्घाटन तसेच मराठी विश्व संमेलनाच्या संकेतस्थळाचे कळ दाबून उद्घाटन संपन्न झाले. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड.ठाकरे, मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. भोसले व मान्यवर उपस्थित होते.

## विशेष लेख...

### प्रेम सोपे, परिणाम मोठे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सोशल मीडियाच्या युगात प्रेम व्यक्त करणे अत्यंत सोपे, जलद आणि थेट झाले आहे. व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि डेटिंग ॲप्समुळे भावना शेअर करणे, फोटो-व्हिडिओ पाठवणे आणि जोडीदार शोधणे एका क्लिकवर शक्य झाले आहे. हे डिजिटल माध्यम अंतर कमी करून संवादाला गती देते, मात्र त्याच वेळी आभासी जगाच्या अतिरेकामुळे नात्यात अविश्वास आणि गैरसमजही वाढू शकतात. विशेष म्हणजे अविश्वास आणि गैरसमजही मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहे.

सोशल मीडियाने प्रेमाची व्याख्या बदलली आहे. ते वरदान आहे की शाप, हे तो किती समंजसपणे वापरला जातो यावर अवलंबून आहे.

एका बाजूला हे प्रेम जोडण्याचे काम करत असले, तरी अतिवापरामुळे गैरसमज, संशय आणि मानसिक तणाव निर्माण होऊन घटस्फोटांचे प्रमाणही वाढल्याचे दिसते.

सोशल मीडियामुळे प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धती बदलल्या आहेत:

जलद संवाद : व्हॉट्सॲप आणि मेसेजिंगमुळे क्षणार्धात भावना (इमोजी/) शेअर करणे सोपे झाले आहे, ज्यामुळे हस्तलिखित पत्रांची जागा डिजिटल संदेशांनी घेतली आहे.

डेटिंग ॲप्सचा वापर : टिंडर, हिंगे सारख्या ॲप्समुळे नवीन लोक शोधणे आणि डेटिंग करणे सोपे झाले आहे, जिथे मित्र-मैत्रिणींच्या मताला (व्हॅलिडेशन) जास्त महत्त्व दिले जाते.

सोशल मीडियाची भूमिका : फोटो, व्हिडिओ आणि स्टोरीज शेअर करून प्रेम व्यक्त करण्यासोबतच, लाईक्स आणि कमेंट्सच्या माध्यमातून नात्याला सार्वजनिक करण्याचे प्रमाण वाढले आहे.

सोशल मीडिया हे दुधारी तलवार आहे. जरा जपूनच वापर करावा.

सोशल मीडियामुळे एखाद्या वस्तूप्रमाणे प्रेमही स्वस्त झाल्यासारखं वाटत आहे. अर्थात आजही प्रेम केलं जातं पण ज्यावेळी आजच्या प्रेमाबद्दल आपण बोलतो त्यावेळी भावनाविहीन प्रेमाचा अंश त्यात दिसतो. मेसेजद्वारे व्यक्त झालेलं प्रेम पाहायला मिळतं ज्यामध्ये फक्त टायपिंग दिसते. शब्दांचा ओलावा दिसत नाही. मित्र किंवा मैत्रिणीचा मोबाईल नंबर मिळाला की सगळं कसं सोप्पं होऊन जातं. तासनतास तिच्यासोबत त्याच्यासोबत न बघता, न भेट घेता चॅटिंग आवडीनिवडीच्या गप्पा हे सगळं आहे, पण सहवास मात्र नसतो यातच चॅटींग करत असताना एखाद-दुसरे वेळी मेसेज वाचूनसुद्धा रिप्लाय मिळाला नाही तर भांडणं होतात. रुसवेफ ुगवे, ब्लॉक-अनब्लॉक, स्टेटस प्रायव्हसी, यातून मानसिक ताण तणाव वाढतो. पासून झालेली सुरुवात गुडबाय आणि ब्रेकअपपर्यंत कधी पोहोचते हेसुद्धा कळत नाही.

आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमे दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. मित्र-मैत्रीणींशी संवाद साधणे, माहिती मिळविणे आणि मनोरंजन करणे यासाठी लोक समाजमाध्यमांवर आपल्या जगण्यातील अधिकांश वेळ घालवितात. मात्र, समाजमाध्यमांच्या अतिरेकामुळे नात्यांमध्ये गैरसमज, अविश्वास, आणि मानसिक तणाव निर्माण होऊन घटस्फोटांच्या वाढत्या प्रकरणांमुळे ही एक सामाजिक समस्या म्हणून उदयास आली आहे. अनेक प्रेम प्रकाराचा शेवट देखील होत आहे नको त्या गोष्टी घडत आहे.

सोशल माध्यमांमुळे क्षणिक प्रेमाचे आकर्षण वाढले आहे अन् आयुष्यभराची जखम मात्र वाढत आहे. सोशल माध्यमांमुळे प्रेम व्यक्त करणं सोपे झाले भेटीगाठी होऊ लागल्या. प्रेम संबंध मध्ये जवळीकता वाढायला लागली. जवळीकतेचे रूपांतर शारीरिक संबंध प्रस्थापित होऊन नको त्या वयात मुलींना गर्भधारणा होऊ लागली, जबाबदारी घेण्यास टाळाटाळ,फसगत,अविश्वास, धोका आणि यातूनच कुमारी मातांचा प्रश्न गंभीर रूपाने समोर आला आहे. नागपूर जिल्ह्याचा जर विचार केला तर ६५० कुमारी मातांनी गर्भपात केल्याची बातमी समोर आली आहे. शाळा महाविद्यालयात तरुण-तरुणी सोशल मीडियामुळे प्रेमाच्या जाळ्यात ओळखून लैंगिक आकर्षणाला बळी पडतात आणि क्षणिक सुख आणि आयुष्य परिणामाला समोर जात आहे. ६५० कुमारी मातांनी केलेला गर्भपात क्षणिक सुखाचे परिणाम आहे.

इन्स्टाग्रामवर मैत्री झाली प्रेम झाले. मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. नंतर विवाह करून सुखी स्वप्न पाहणाऱ्या तरुणीची हत्या तिच्या पतीनेच केल्याची धक्कादायक घटना मध्यप्रदेश मधील भोपाळ येथे १२ फेब्रुवारीला उघडकीस आली.

## कशी तुला समजावू ?

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आमच्या वर प्रश्नांची सरबत्ती सुरू व्हायची बहुतेकदा गाडीवर असताना. एकतर गाडी चालवताना अनेक व्यवधानं सांभाळावी लागतात. दुसरं म्हणजे मागच्याचा आवाज ऐकू येत नाही. असं असतानाही, 'ऐकू कसं येत नाही गं तुला?' हे पालुपद पाठीमागं बसलेल्या कृष्णाचे सुरू असायचंच. मग तीनचारदा एकच प्रश्न ऐकल्यावर ते शब्द समजायचे. पण ते इतके गोंधळ निर्माण करणारे असायचे की वाटायचं कुठंतरी कोपऱ्यात, बाजूला वगैरे घ्यावी गाडी. थांबावं. सगळं ट्रॅफिक शिट्या वाजवून थांबवावं. पादचारी, सायकलस्वार, हातगाडीवाले, पालक-बालक सर्वांना थांबायला सांगावं आणि मग शांत चित्ताने प्रश्न ऐकावा आणि तितक्याच शांतपणे 'नाही रे मला पटकन सांगता येत नाही' असं म्हणावं. पण नव्हतं ना तसं शक्य. तर झालं होतं असं.

गर्दीतून वाट काढत कसंबसं एक आणि त्यानंतर आणखी एक वळण घेतलं आमच्या गाडीनं. आता गाडी गर्दीने घुसमटलेल्या हमरस्त्यावर आली आणि चिरंजीव वदले.

''आई, आपण वळवळलो.''

मी नेहमीप्रमाणे धक्क्यातच.

दोनदा तीनदा कृष्णा तेच म्हणाला. आता मात्र मी खरोखरच गाडी थांबवली आणि विचारलं काय म्हणायचंय तुला नक्की.

डोक्यावर हात मारत चिरंजीव म्हणाले. ''आई.. अगं आत्ता आपण वळवळलो. ''मी जरा वैतागूनच म्हटलं, 'जरा इस्कटून सांग.'

मिहिंग्लीश बोलणाराला इस्कटून हा शब्द नाही समजला. मग तो बुचकळ्यात पडला. मग मी उसन्या खुशीत म्हटलं. 'प्लीज इलाबोरेट ' तेव्हा खुलासा करण्यासाठी परत आपण वळवळलो.. असंच त्यानं ठास्सून सांगितलं..

मी म्हटलं, 'आपण काय सरपटणारे प्राणी आहोत का वळवळायला?

''अगं, एक वळण घेतलं की आपण म्हणतो ना की आम्ही वळलो.



मग आत्ता ज्या रस्त्याने आपण आलो. त्या रस्त्यावर आपण दोनदा नाही का वळलो? दोनदा वळलो म्हणून वळवळलो. कळ्ळं का?''

मी समजावण्याचा प्रयत्न करत म्हटलं, 'तसं नसतं रे ते.'.

तो ठसक्यात म्हणाला,''मग कसं? काय हरकतै वळवळलो म्हणायला?''

कशी तुला समजावू? अशी अवस्था माझी झाली होती. जी नेहमीच असायची. आता मी इस्कटून सांगणार तोवर पोलिसमामांनी ओठांचा चंबू करून त्यातून हवा बाहेर सोडली ती शिटीतून बाहेर पडली. त्या हवेचा जो आवाज झाला त्यावर जर त्वरीत प्रतिक्रिया दिली नाही तर पर्सला फोडणी बसणार होती. म्हणून.''इथून काढता पाय घेऊ लवकरच ''.असं माझ्या तोंडून गेलं. तर कृष्णा जवळजवळ किंचाळत म्हणाला..

''आ.....ई, काढता पाय घ्यायला आपण काय पादचारी आहोत का आत्ता? आपण गाडीवरौत.''.

आता फार समजावून सांगायची वेळ नव्हती आणि माझी क्षमताही नव्हती. मी एका हाताने मला काही ऐकू येत नाही अशी खूण केली आणि घर गाठलं. दारात मित्रमहोदयांची फौज आतुरतेने वाट बघत असलेने मी सुस्कारा सोडला.

''असं का?'' या सदराचा गाभा नेमका हाच आहे. मुलांच्या भाषेतून उलगडत जाणारं त्यांचं विचारविश्व. ही वरकरणी हलकी-फुलकी, विनोदी वाटते; पण त्यामागे कृष्णासारख्या मुलांची तर्कशक्ती, भाषिक प्रयोगशीलता आणि आई-मुलाच्या नात्यातला जिवंत संवाद हे आहे.




या घटनेकडे बघताना पहिली लक्षात येणारी गोष्ट म्हणजे भाषा ही मुलांसाठी खेळण्यासारखी असते. ''दोनदा वळलो म्हणजे वळवळलो'' हा कृष्णाचा निष्कर्ष हा भाषेच्या नियमांवर केलेला त्याचा स्वाभाविक प्रयोग आहे. मुलं भाषा पाठ करून शिकत नाहीत, त्यांनी ऐकलेल्या शब्दांच्या पॅटर्नवरून ते स्वतःचे नवे शब्द तयार करतात. कुकडं , एगाडगं चहावरा सारख्या शब्दांबद्दल आपण मागेच चर्चा केलीय.

अशाच प्रकारे 'वळवळलो' हा शब्द तयार केला त्यानं. यात चूक नाही, तर ती भाषिक सर्जनशीलतेची खूण आहे असं मला वाटलं

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे बालतर्क. मोठ्यांच्या दृष्टीने ''वळवळलो'' हास्यास्पद वाटू शकतो; पण कृष्णाच्या मनात तो अत्यंत योग्य आहे. दोनदा कृती झाली, तर शब्दही दुप्पट व्हायला हवा हा त्याचा गणिती विचार. मुलं जग समजून घेताना नियम शोधतात. ते नियम कधी भाषिक असतात, कधी वर्तनाचे. इथे त्याने 'वळलो' या शब्दावर स्वतःचा नियम बनवला आहे.

तिसरा पैलू म्हणजे परिस्थितीतील विसंगती. मी गाडी चालवत होते माझं लक्ष रस्त्यावर, ट्रॅफिकवर. मुलाचं लक्ष मात्र अनुभवावर आणि भाषेवर. माझ्या मनावर ताण, व्यवधानं; मुलाच्या मनात कुतूहल. ही दोन भिन्न मानसिक स्थिती एकाच क्षणी होती आणि तिथे विनोद निर्माण होतो. पण या विनोदात आई म्हणून माझी घालमेलही दडलेली आहे. ''कशी तुला समजावू?'' ही अवस्था झाली माझी. ती मला त्याला समजावून सांगायला शब्द सापडत नव्हते ही अडचण नव्हती; पालकत्वाची ती समस्या होती.

''काढता पाय घेऊ'' या वाक्यावर कृष्णाने घेतलेला शब्दशः अर्थ हा चौथा महत्त्वाचा मुद्दा. मुलं भाषेतील अलंकार, म्हणी, वाक्प्रचार हे शब्दशः घेतात. त्यांना भाषेतील लाक्षणिक अर्थ अजून उमजलेला नसतो. म्हणूनच तो म्हणाला होता की ''आपण काय पादचारी आहोत का?'' या निरीक्षणातून कळतं की मुलं शब्द ऐकतात, त्याचा मूळ अर्थ लावतात आणि मग वास्तवाशी ताडतात. हा भाषिक विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे असं मला वाटतं.

मुलं फक्त प्रश्न विचारत नाहीत, तर जे काही ते पाहतात, ऐकतात किंवा अनुभवतात, त्यावर त्यांचे मन सतत विचार करत असते.

त्यांच्या प्रश्नांची ''सरबत्ती'' ही फक्त त्रासदायक गोष्ट नाही, तर त्यांचा मेंदू किती सक्रिय आहे याची ती खूण असते. मुलं सतत निरीक्षण करतात, गोष्टींची तुलना करतात, नियम शोधतात आणि स्वतः पडताळणी करतात जसं कृष्णानं ''वळवळलो'' हा शब्द वापरताना स्वतःचा नियम बनवला. प्रश्नांची संख्या किंवा वारंवार प्रश्न विचारले जाणे हे दुर्बलतेचे नाही, तर बालकांचा जिज्ञासू आणि सक्रिय मेंदू सतत चालू असल्याचे लक्षण आहे. त्यांना या प्रक्रियेतून शिकण्याची, समजण्याची आणि स्वतःचे अनुभव तयार करण्याची संधी मिळते.

या घटनेतील आई म्हणून माझी भूमिकादेखील तितकीच महत्त्वाची आहे. मी वैतागले, चिडले, गोंधळले शेवटी ''मला काही ऐकू येत नाही'' अशी खूण करून मी त्या प्रसंगातून माझी सुटका करून घेतली . तरीही मनात प्रश्न मनात रेंगाळत राहिला. हा जिवंतपणा म्हणजेच ''असं का?'' या सदराचं मूळ बीज.


म्हणून हा प्रसंग फक्त विनोदी नाही.

तो मुलांच्या विचार करण्याच्या पद्धतीचा, त्यांच्या भाषेतील कल्पकतेचा आणि पालक म्हणून माझ्या संयमाची परीक्षा ठरला.

मुलं जेव्हा निरागसपणे प्रश्न विचारतात, तेव्हा आपण भाषेकडे नव्या नजरेने पाहायला शिकतो. त्यांची ''चूक'' ही खरं तर चूक नसतेच ती त्यांच्या विचारांची सुरुवात असते.

आणि म्हणूनच शेवटी पुन्हा तोच प्रश्न उरतो ''असं का?''

कारण मुलं वेगळ्या नजरेने जग पाहतात आणि त्या नजरेतून आपल्यालाही स्वतःकडे नव्याने पाहायला भाग पाडतात.




## जात्यावरच्या ओव्या......

न्हाणीघरापाशी
रांजण भरला पाण्याचा
चार लेकी दहा नातू
वादा केलाय येण्याचा ||५०२||

न्हाणीघरापाशी
वजर्या नानापरी च्या
लेकी सुना घासती
पाठी एकमेकींच्या ||५०३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनाचे श्लोक - एक सार्वकालिक मनोपनिषद




ज्योतिर्मय साहित्य

मनाच्या श्लोकांचा अनेक भाषांमध्ये अनुवाद देखील झाला आहे.


समर्थांचे दासबोध हे महाकाव्य तर प्रसिद्धच आहे परंतु सर्वांनीच दासबोध वाचला असेल असे काही सांगता येत नाही. परंतु ज्याला ज्याला मराठी येते त्याला लहानपणापासूनच मनाच्या श्लोकांचा परिचय असतो. कोणत्या ना कोणत्या मार्गाने मनाचे श्लोक लहानपणापासून सतत त्याच्या कानावर पडत असतात. अशाच प्रकारचा मनाच्या श्लोकांचा प्रभाव लहानपणापासून माझ्यावरही आहे. लहानपणी मी ते पाठ केले आणि आजपर्यंत ते वेगवेगळ्या प्रसंगी ऐकत आलो. लहानपणी ते पाठ करायचे म्हणून केले होते परंतु त्यांचा अर्थ फारसा कळत नव्हता. आताही तो फार कळतो आहे अशातला भाग नाही. परंतु जीवन जगण्यासाठी या मनाच्या श्लोकांची फार मोठी मदत आपल्याला होऊ शकते एवढी गोष्ट मात्र माझ्या लक्षात आली आणि त्याच उद्देशाने हा मनाच्या श्लोकांवर लिहिण्याच्या लेखमालेचा प्रपंच आरंभला आहे.




मनाचे श्लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे कोणताही उपवास किंवा जपजाप्य यात सांगितले नाही. कोणत्याही कठोर नियमांचे पालन करायचे नाही. हा आपल्या स्वतःच्या मनाला केलेला उपदेश आहे. आपले मनच आपला मित्र किंवा शत्रू असते. प्रपंच असो किंवा परमार्थ तो करण्यासाठी आपले मन आपल्याला अनुकूल असावे लागते. बहिणाबाई म्हणतात, मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर, किती हाकला हाकला फिरी येतं पिकावर. मन हे अतिशय चंचल आहे म्हणूनच अशा या मनाला समर्थांनी उपदेश केला आहे. मनाला आजार झाला असेल तर औषध मनालाच द्यावे लागते. म्हणूनच समर्थांनी जनसामान्यांच्या कल्याणासाठी हा मनाच्या श्लोकांचा प्रपंच केला असे म्हणता येईल.

मराठी साहित्यातील आणि संतकाव्यातील मनाचे श्लोक हे केवळ आध्यात्मिक काव्य नसून, ते मानवी मनाला उन्नत करणारे एक प्रगत मानसशास्त्र आहे. १७ व्या शतकात समर्थ रामदास स्वामींनी रचलेले हे २०५ श्लोक आजही तितकेच प्रस्तुत वाटतात, याचे मुख्य कारण म्हणजे यात केवळ परमार्थाची चर्चा नसून हे मनावर विजय मिळवण्याचे प्रयोगात्मक शास्त्र आहे.

(क्रमशः)




## ईश्वरप्राप्तीचा मार्ग - खरी तळमळ आणि संपूर्ण शरणागती



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसता विषयाचा त्याग केल्याने ईश्वराची प्राप्ती होत नाही; बायकोचा त्याग करून होत नाही; जनात राहून होत नाही, तसेच वनात राहिल्यानेही होत नाही. खरे म्हटले म्हणजे अमुक असे काही नाही, की जे केल्याने त्याची प्राप्ती होईल. तसे असते तर साधू ओळखायला काहीच वेळ लागला नसता. संत हे यांपैकी काय करीत नाहीत ? काही प्रपंच करतात तर काही वनात राहतात. म्हणून काय, की अमुकच केले म्हणजे ईश्वराची प्राप्ती होते असे नाही. मग असे काय आहे, की जे केल्याने त्याची प्राप्ती होते ? तर त्यासाठी एकच लागते, ते म्हणजे, ईश्वराची प्राप्ती व्हावी ही मनापासून तळमळ लागली पाहिजे. ज्याला अशी तळमळ लागली त्याचे निम्मे काम झाले. ज्याप्रमाणे मोठी इमारत बांधण्यासाठी तिचा पाया अगोदर बळकट असावा लागतो, त्याप्रमाणे खरी तळमळ लागली म्हणजे पुढले कार्य व्हायला फार अडचण पडत नाही; आणि हे व्हायला भाग्य लागते. तळमळ लागल्यावर सर्व भोगांचा त्याग करावाच लागतो असे नाही. आपण रामाचे आहोत असे आपल्याला मनापासून वाटले पाहिजे; आणि त्याला शरण जाऊन आपण त्याचे आहोत असे वागले पाहिजे; म्हणजे मनाने त्याचे झाले पाहिजे. असे करण्याने आपला प्रपंच बिघडेल असे वाटते का ? आपण नोकरी करतो त्यावेळेस अंमलदाराबद्दल आपले चांगले मत असते का ? तो आपल्याला मनाने आवडत नसूनही आपण देहाने त्याचे काम करतोच की नाही ? तसे, आपण मनाने रामाचे आहोत असे ठरवून देहाने प्रपंच करावा, म्हणजे प्रपंच न बिघडता उलट चांगला होतो; कारण आपण ज्याला शरण गेलो त्याला त्याची लाज असते. बिभीषण रामाला शरण आला, तेव्हा त्याला मारून टाकावा असेच बाकीच्यांनी सांगितले. तरी पण रामाने सांगितले की, '' जो मला शरण आला त्याचे रक्षण करणे माझे काम आहे. '' शरणागताला नुसते जीवदान देऊन तो राहिला नाही, तर त्याला लंकेचे राज्य दिले. म्हणून सांगतो की, जो त्याचा होऊन राहतो, त्याची लाज रामाला असते.

माझ्याकडे इतकेजण येतात, पण एकाने तरी ' मला रामाची प्राप्ती करून द्या ' म्हणून विचारले का ? मी आलो आहे तो काय तुमचे विषय पुरविण्यासाठी ? समजा, एकजण चोरी करायला निघाला आणि वाटेत त्याला मारुतीचे देऊळ लागले. तिथे जाऊन मारुतीला नवस केला की, '' मला जर आज चोरीत यश आले तर मी तुझ्या देवळावर सोन्याचा कळस चढवीन; '' तर आता सांगा, त्याला मारुतीने काय द्यावे ? त्याने त्याच्या नवसाला पावावे असे तुम्हाला वाटते का ? जर नाही, तर तुम्ही विषय मागितले आणि मी दिले नाहीत तर मला दोष का देता ? आपल्याला नवस करायचा असेल तर असा करावा की, '' मला तू ज्या स्थितीत ठेवशील त्या स्थितीत आनंद म्हणजे समाधान रहावे, आणि दुसरे काही मागण्याची इच्छाच होऊ नये. ''

साधकाने शक्य तितके कर्तव्य करावे, आणि मग भगवंत किंवा गुरू पाहून घेतील असे म्हणून आनंदात राहावे.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### ♦दिवस पहिला♦

पुढे......

गुरुजी प्राचीन काळी वेद शिकवीत.मुले डुलत डुलत ते वेद घोकत. डुलत डुलत डुलकी लागे म्हणून गुरुजी शिष्याची शेंडी झाडाच्या पारंबीस बांधीत मग शेंडी वा पारंबी तुटली तरी घोकंपट्टी थांबवायची नाही असा दंडक असे. यावरून ही म्हण पडली.

प्रतिबंधाला ओलांडून, न थांबता पुढे जायला हवे.

हळू हळूहळू प्रतिबंध सारून पुढे जावे लागेल.ध्येय निश्चिती करता आम्हाला भागवत ऐकावे लागेल. मग साधन स्वीकारावे लागेल. वारंवार केल्याने सुधार होतो. पोळी तयार करताना पहिल्याच वेळेस पोळी जमत नाही. हळुहळू जमते. याला अभ्यास म्हणतात. एखादी गोष्ट अत्यंत आदराने, दीर्घकाळ, निरंतर केल्याने अभ्यास होतो. विश्वास व सातत्य हे साधनाचे दोन गुण आहेत. ध्येय निश्चिती, साधन करणे, साधनाच्या मूळाशी असणाऱ्या विश्वास व सातत्य हे तीन बाबींसाठी आम्ही भागवत ऐकावे. चोखोबा रायांना मंदिरात प्रवेश नव्हता. त्याचे साठी ही अडचण नव्हती. त्यांची वृत्ती पांडुरंगा पासुन ढळलीच नाही. पांडुरंगांनी त्यांना बाहेर येऊन दर्शन दिले. वृत्ती जेव्हा साध्याशी एकरूप होते तेव्हा प्रतिबंध आडवे येत नाहीत. प्रपंच एकदा केला की सुखाचा वाटतो. पण परमार्थ अनेक वेळा करत रहावा लागतो. हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा असे माऊली दोन दोनदा सांगतात. म्हणून भागवत ऐका, पुन्हा पुन्हा ऐका. आपल्या पारमार्थिक जाणिवा समृद्ध व्हाव्यात. भागवत संपले की लगेच तुम्हा सर्वांना न्यायला भगवंताचे विमान येईल असे नाही पण पारमार्थिक श्रीमंती वाढायला हवी.

क्रमश:.............

## || अभंग-माधव ||



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



माय अन् बाप l ईश्वराचे रूप l
जपा त्यांना खूप l जीवापाड ll१ll
मातेने मायेने l उदरी रक्ताने l
पोशिले प्रेमाने l नऊ मास ll२ll
देण्याला शिक्षण l तसेच संस्कार l
कष्टीले ते फार l मायबाप ll३ll
ऐशा मायबापा l देती जे अंतर l
तया भयंकर l पाप लागे ll४ll
देऊ नका कधी l मायबापा त्रास l
त्यांचा सहवास l पुण्य देतो ll५ll
माधव हा म्हणे l सांगतो सर्वांना l
मायबापा माना l भगवंत ll६ll




# डोळ्याला चष्मा-नजर कमजोर? एक ग्लास दुधात हा पदार्थ घालून रोज प्या, नजर होईल तेज.....

ज्योतिर्मय साहित्य

डोळ्यांना चष्मा नको वाटतो, चशष्म्यामुळे नाकावर खुणा उमटतात अशी बऱ्याचजणांची समस्या असते. काही सोपे व्यायाम करून तसंच खाण्यापिण्यात बदल करून तुम्ही डोळ्यांचे आरोग्य सुधारू शकता. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीनं असा एक उपाय शोधलाा आहे. ज्यामुळे रेटीनाचे नर्व्स ट्रॅक करून आरोग्याच्या समस्यांची माहिती मिळू शकते. मायोपिया. ड्राय आय सिंड्रोम आणि ग्लुकोमा यांसारख्या डोळ्यांच्या समस्या उद्भवू शकतात.

जर तुम्हाला वयाच्या चाळिशीत किंवा त्याआधीच डोळ्यांच्या समस्या उद्भवत असतील किंवा तुम्हाला धुसर दिसत असेल किंवा डोकं दुखत असेल तर ग्लुकोमा या आजाराची सुरूवात असू शकते. शुगर पेशंट्सनी हे आजार टाळण्यासाठी अजून काळजी घ्यायला हवी. डायबिटीसच्या आजारानं जगभरातील सव्वा कोटीपेक्षा जास्त लोक त्रस्त आहेत.

रिर्पोटनुसार जर तुम्हाला चष्मा काढायचा असेल तर अधुनिक शस्त्रक्रिया हा सर्वोत्तम उपाय आहे. यात लेझरच्या साहाय्यानं कॉर्नियाचा आकार बदलला जातो. हे अत्यंत सुरक्षित आणि लोकप्रिय आहे. ज्यांचा कॉर्निया पातळ असतो त्यांच्यासाठी हा पर्याय निवडला जातो. ही एक प्रगत आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह पद्धत आहे. जर तुमचा नंबर खूप जास्त असेल तर डोळ्यात कायमस्वरूपी लेन्स बसवली जाते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी घरगुती उपाय कोणते...?

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी तुम्ही काही सोपे उपाय करू शकता जसं की सकाळी आणि संध्याकाळी ३० मिनिटं प्राणायम करा. अनुलोम-विलोम आणि भ्रामरी हे व्यायामसुद्धा डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतात.

डोळे चांगले ठेवण्यासाठी महा त्रिफळा घृत पिणं फायदेशीर ठरतं...

१ ग्लास दूधासोबत १ चमचा हे चूर्ण घ्या. दिवसातून २ वेळा हा उपाय केल्यास चांगला परिणाम दिसून येईल.

एलोवेरा ज्यूस, आवळ्याचा ज्यूस डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते. तुम्हाला तुमचे डोळे चांगले ठेवायचे असतील तर नेहमी मोबाईल वापरण्याची सवय सोडायला हवी. योगगुरू बाबा रामदेव यांनी सांगितलेले उपाय तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. गाजर, रताळे, स्ट्रॉबेरी, आवळ्याचे सेवन डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते.

***



## लघु बोधकथा

### ♦शौर्य आणि शहाणपण♦

रामाच्या सेनेत एक वानर होता. त्याच्या मनात एकदा आले की, रामात आणि आपल्यात काय फरक आहे. त्याला असलेले सर्व अवयव आपल्याला आहेत आणि आपल्याला एक शेपूटही जास्त आहे. सुग्रीवाने आपल्या सहका-याच्या मनातला भाव ओळखला. सुग्रीवाला किंचीत राग आहे. रामानेही त्याच्या मनातला भाव ओळखला पण त्याने त्या वानराला पुढे बोलावले व सांगितले,'' आज तू वानरसेनेचे आधिपत्य कर.'' वानर खूष झाला. राक्षससैन्य चालून येऊ लागले. धुडगुस घालू लागले. याबरोबर या वानरसेनापती महाशयांनी शेपटीने एक झाड उपटले आणि शेकडो राक्षसांवर फेकून दिले. त्याचा पराक्रम पाहून सुग्रीवही हरखून गेला. आता सुग्रीवाच्या मनातही रामात आणि या वानरात काय फरक आहे हा विचार येऊ लागला. हा विचारही रामाला कळून चुकला पण प्रभू रामचंद्र गप्प राहिले. काही वेळाने शस्त्रांचा उपयोग होत नाही हे पाहून राक्षसांच्या सेनापतीने युक्ती केली व त्याने मोठेमोठे नारळ काढून वानरसैन्याकडे फेकायला सुरुवात केली. वानरसैन्याने या नारळांचे काय करायचे हे न सुचल्याने ते फोडून खायला सुरुवात केली. वानरसैन्य व सेनापती नारळ खात आहेत हे पाहून राक्षससेनापतीने आपल्या सैन्यानिशी मोठा हल्ला केला व काही वानरांना ठार केले. यावरही प्रभू रामचंद्रांचे लक्ष होते. त्यांनी राक्षससैन्यावर बाणांनी हल्ला केला व राक्षससैन्यास मागे फिरवले. यात सुग्रीवाला रामचंद्र व वानर यांच्यातील फरक लक्षात आला.

तात्पर्य : माणसाचा मोठेपणा हा शौर्यापेक्षा शहाणपणाने ठरतो.

# पहिले अ.भा. वैद्यकीय साहित्य संस्कृती संमेलन दिमाखात संपन्न

## इंडियन मेडिकल असोसिएशन छत्रपती संभाजीनगर शाखेचे आयोजन






**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : वैद्यकीय क्षेत्र आणि साहित्यविश्व यांचा राष्ट्रीय स्तरावरील हा पहिलाच संगम ठरला. उद्घाटन सोहळा, ग्रंथपूजन, ग्रंथदिंडी, विविध परिसंवाद, काव्यवाचन, गझल, प्रकट मुलाखती, सन्मान समारंभ आणि अभ्यासपूर्ण सत्रे अशा सर्व अंगांनी हे संमेलन परिपूर्ण ठरले.

सभागृहाची आकर्षक मांडणी, सुबक नियोजन, शिस्तबद्ध अंमलबजावणी आणि सर्वत्र जाणवणारी आत्मीयता यामुळे वातावरण भारले होते. वैद्यकीय व्यासपीठावर साहित्याचा सन्मानपूर्वक उत्सव साजरा होत असल्याचे चित्र उपस्थितांनी अनुभवले.

संमेलनाची सुरुवात ग्रंथपूजन आणि ग्रंथदिंडीने झाली. पुस्तकांची मानाची मिरवणूक काढण्यात आली. ज्ञान आणि संस्कृतीचा गौरव करणारी ही दिंडी संमेलनाचा वैशिष्ट्यपूर्ण प्रारंभ ठरली. पुढील सत्रांमध्ये काव्यवाचन, ललित लेखन, वैद्यकीय अनुभव कथन आणि गझल सादरीकरण यांद्वारे वैद्यकीय क्षेत्रातील संवेदनशीलता आणि सर्जनशीलता प्रभावीपणे व्यक्त झाली.

या ऐतिहासिक व्यासपीठावर एक पद्मभूषण, तीन पद्मश्री, एक केंद्रीय मंत्री, दोन राज्यसभा सदस्य, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारप्राप्त डॉक्टर, लॅन्सेटमध्ये लेखन करणारे संशोधक डॉक्टर, सर्पदंश व विंचूदंशावर उपचार करून पंचवीस हजारांहून अधिक रुग्णांना जीवनदान देणारे डॉक्टर, ऑक्सफर्ड येथे अतिथी प्राध्यापक म्हणून निमंत्रित होणारे डॉक्टर, पाच वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिष्ठाता तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष अशा मान्यवरांचा एकत्र सन्माननीय सहभाग लाभला.

डॉ जब्बार पटेल, विश्वास पाटील, मंगेश हडोळे, अरविंद जगताप यांसह अनेक मान्यवरांनी संमेलनाची उंची वाढवली.

तसेच डॉ विकास महात्मे, डॉ भागवत कराड, डॉ अशोकराव कुकडे, डॉ अश्विनीकुमार तुपकरी, डॉ राजेंद्र मालोसे, डॉ हिम्मतराव बावसकर, डॉ अशोक बेलखोडे, डॉ दिलीप पुंडे, डॉ बालाजी गलधर आणि इतर ज्येष्ठ विभूतींचे मार्गदर्शन लाभले.

या संमेलनाची संकल्पना डॉ अनुपम टाकळकर यांच्या स्वप्नातून साकार झाली. डॉ शहाजी तौर यांनी नियोजनबद्ध अंमलबजावणी करून या संकल्पनेला भक्कम आकार दिला. सचिव डॉ योगेश लक्कस, डॉ आसावरी टाकळकर, डॉ उर्मिला चाकूरकर, डॉ शिवाजी पोले आणि संपूर्ण कार्यकर्त्या टीमने अथक परिश्रम घेतले. डॉ यशवंत गाडे, डॉ संतोष रांजळकर, डॉ दत्ता कदम आणि डॉ पी एम दरक यांचे मार्गदर्शन आणि शुभेच्छा लाभल्या.

या संमेलनातून डॉक्टर लेखकांना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळाले. वैद्यकीय क्षेत्रातील ज्ञान आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचा संगम साधत संभाजीनगरने एक नवा इतिहास घडवला आहे.

संमेलन अध्यक्ष – डॉ जब्बार पटेल, संमेलन उद्घाटक– डॉ विश्वास पाटील, संमेलन स्वागताध्यक्ष – डॉ अनुपम टाकळकर, संमेलन कार्याध्यक्ष– डॉ शहाजी तौर, सचिव – डॉ योगेश लक्कास, स्मरणिका संपादिका– डॉ निशा तौर, कार्यवाहक– डॉ यशवंत गाडे, संयोजक– डॉ आसावरी टाकळकर, सहसंपादिका– डॉ उर्मिला चाकूरकर हे होते.

# श्रीयश फार्मसीच्या प्रा. रश्मी तांबारे यांना बेस्ट पोस्टर प्रेझेंटेशन अवॉर्ड

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई यांच्या सहकार्याने रामा इंटरनॅशनल येथे आयोजित करण्यात आलेल्या इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये विविध राज्यांतील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. परिषदेत संशोधनाधिष्ठित विषयांवर सखोल चर्चा आणि सादरीकरणे झाली.




या परिषदेत प्रा. रश्मी तांबारे यांनी ''लाँग-ॲक्टिंग पीएलजीए नॅनोपार्टिक्युलेट डेपो ऑफ बुसेरेलिन ॲसिटेट फॉर हार्मोन-रिस्पॉन्सिव्ह ब्रेस्ट कॅन्सर'' या महत्त्वपूर्ण संशोधन विषयावर पोस्टर प्रेझेंटेशन सादर केले. त्यांच्या संशोधनाची गुणवत्ता, नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि प्रभावी सादरीकरणाची परीक्षकांनी विशेष दखल घेत त्यांना ''बेस्ट पोस्टर प्रेझेंटेशन अवॉर्ड'' प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, श्रीयश फार्मसीचे प्राचार्य डॉ. गणेश तापडिया, शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# पंढरपूर येथे दिव्यांग शिबीर उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

''सेवा परमो धर्म:'' या उक्तीला जागत, आज दि.१४ फेब्रुवारीला पंढरपूर येथे दिव्यांग बांधवांसाठी एक अत्यंत स्तुत्य उपक्रम भारत विकास परिषद शाखा, पंढरपूर यांच्या वतीने संपन्न झाला.

महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. पुणे यांच्या अंतर्गत भारत विकास परिषद, पंढरपूर आणि दिव्यांग केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच कै. महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठान, मंगळवेढा यांच्या सहयोगातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत दिव्यांग शिबिराचे उद्घाटन मा. आ. प्रशांत परिचारक व आमदार समाधान दादा आवताडे यांच्या हस्ते श्री.विठ्ठल,आणि दिव्यांगांचे आर्टिफिशियल पाय व हाताचे पूजन करून मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

सामाजिक बांधिलकी जपत, दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यासाठी हे शिबिराच्या माध्यमातून प्रत्येक वंचित घटकापर्यंत विकास आणि सेवा पोहोचवणे, हेच आमचे ध्येय आहे.असे अध्यक्षा सौ.स्मिता कोर्टीकर म्हणाल्या.

कार्यक्रमास भारत विकास परिषद पुणेचे डॉ. विनयजी खटावकर व सर्व सहकारी उपस्थित होते. तसेच दत्ताजी चितळे,डॉ. श्री व सौ.काणे डॉ. अनिल पवार, मिलिंद वाघ,मंदार केसकर, सौ.माधुरी जोशी, सुनील परळीकर उपस्थित होते. सदर शिबिरात जवळजवळ अडिचशे ते तीनशे दिव्यांग गरजू उपस्थित होते.कार्यक्रम सिध्दीस नेण्यासाठी सतिश कोर्टीकर, भारत गदगे,अनुराधा हरिदास,भाग्यश्री लिहीणे,विवेक परदेशी, श्री.सौ. शिरगावकर, महावीर गांधी माधुरी जोशी, रत्नाकर देशपांडे, सीमा कुलकर्णी, प्रीती वाघ, मनोज कुलकर्णी, संतोष कुलकर्णी, अजित कुलकर्णी, सचिन बेणारे, आयाचित सर, पाठक सर, चैतन्य उत्पात,या सर्वांच्या टिम वर्क मुळे कार्यक्रम दिमाखात पार पडला. असे विकास परिषदेचे दत्तात्रय तरलगट्टी यांनी सांगितले.

मूल मराठी लेखिका - मंजुषा मुळे हिन्दी भावानुवाद - डॉ. मीना श्रीवास्तव

## समवेदना

सई और सचिन, दोनों की ही पिछले चार-पाँच महीनों से भागदौड़ जारी थी। पूरा एक महीना तो बस योजना बनाने में ही निकल गया। दूल्हा-दुल्हन के को लाभान्वित करने वाला विवाह का शुभ मुहूर्त तय होने के पश्चात् जब उन्हें ज्ञात हुआ कि, उस दिन उनका पसंदीदा सभागृह उपलब्ध है, तो उन्होंने उसका तत्काल आरक्षण कर लिया| अब उनकी असली भागमभाग की शुरुवात हुई|

बहुत पहले से ही उन दोनों ने अपनी लाड़ली इकलौती बिटिया का विवाह बड़ी धूमधाम से मनाने का फैसला कर लिया था - लेन -देन, बारातियों का आदर सम्मान जैसे अहम प्रश्नों के उत्तर समधी जी ने बड़े सलीक़े से दे दिए थे, सो उन दोनों के तनावग्रस्त मन को काफी राहत मिली थी| परन्तु अन्य साज सामान की खरीदारी, गहने, घरेलू सामान, पूजा की तैयारी, घर की सजावट एवं कई अन्य चीजें बाकी थी| उस पर निमंत्रण सूची पर काफी विचार-विमर्श चल रहा था, तब कहीं जाकर अंतिम फेहरिस्त तैयार होने वाली थी| ऐसे में निमंत्रण पत्रिका का चयन भी एक समय लेने वाली प्रक्रिया होती है| आने वाले समय में तो बस काम का अटल पहाड़ सामने उनके इंतजार में था। उन दोनों की अक्सर कई मुद्दों पर गहन चर्चा होती, कभी कभी थोड़ी गर्मजोशी से बहस होती, परन्तु इस जुगाली के अंत में जैसे उनमें मतैक्य हो जाता, वैसे इस बार भी वे कई मुद्दों पर सहमति बना चुके थे। विचारों के धागे उलट पलट कर उलझे तो थे लेकिन धीरे धीरे उनको सुलझाने के निरंतर प्रयास के कारण यह उलझन अंततः समाप्त हो गई, और प्रत्येक कार्य योजना के अनुसार मुकाम हासिल करता रहा।

जल्द ही निमंत्रण देने का सिलसिला भी ख़त्म हो गया| चाय-नाश्ते का पूरा ऑर्डर ही दिया गया था। अपने सगे सम्बन्धियों को भेंट करने के लिए उपहार पैक करके तैयार कर लिए गए। खाना बनाने एवं ऐन वक्त पर उभरने वाले तमाम आकस्मिक काम काज करने के लिए दो अतिरिक्त कामकाजी महिलाऐं भी गत आठ दिन से जुट गईं थीं| घर की सजावट शुरू हो चुकी थी। जहाँ विवाह संपन्न होने वाला था उस हॉल में ले जाने वाले सामान से भरे बैग पैक होकर तैयार थे —यानी सारी तैयारियाँ हो चुकी थीं— दोनों में उत्साह की लहरें उमड़ रहीं थीं| उनकी उमंगों का ज्वार मानों उफान पर था| देखते देखते कल आने वाला गणेश और मातृका पूजन का दिन देहलीज पर खड़ा दस्तक दे रहा था।

क्रमश:......

ज्योतिर्मय
Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999



SWP की अक्षय पात्र?

मित्रांनो काल परवा तुम्ही माझ्या लेखातून SWP बद्दल माहिती वाचलीत या अक्षय पात्राची तुलना SWP बरोबर होईल का?
मला तर अक्षय पात्र आणि SWP यांच्यात खुपचं साम्य आहे असे वाटते, नव्हे ते आहेच.
तुम्ही एकदा म्युच्युअल फंडामध्ये पुरेशी इन्व्हेस्टमेंट केली आणि SWP ॲक्टिव्हेट केले की दरमहा नियमित उत्पन्नाची अविरत अशी गंगा यातुन वाहू लागते....या गंगाजळीतुन तुम्ही आवश्यक तेवढे अथवा गरजे इतकेच पैसे काढत राहिलात तर ही गंगाजळी घटण्या ऐवजी वाढत जाते.
म्हणजे आज तुमच्या गंगाजळी तुन तुम्ही फिक्स्ड डिपॉझीटच्या व्याजा सारखेच पैसे घेत राहिलात तर म्युच्युअल फंड निर्माण करत असलेल्या अतिरिक्त रीटर्नस मुळे गंगाजळीत भर पडत राहते.
तुम्ही तुमच्या साठी आणि कुटुंबा साठी अक्षय पात्र बनवा, SWP करा.
अक्षय पात्राची कथा आपल्याला शिकवते की, जिथे खरी भक्ती आणि श्रद्धा असते, तिथे ईश्वर स्वतः भक्ताच्या मदतीला येतो आणि थोड्याशा अर्पणातही (SIP) संपूर्ण कुटुंबाला तृप्त करण्याची शक्ती असते.

आम्ही तुमचे पुस्तक प्रकाशित करू!
ज्योतिर्मय प्रकाशन
प्रत्येक लेखकाचं एकच स्वप्न असते ते म्हणजे माझ्या कवितांचे, लेखांचे, कथांचे, कादंबरीचे पुस्तकात रूपांतर व्हावे व ते जास्तीतजास्त वाचकांपर्यंत पोहोचावे, मग हे स्वप्न आम्ही पूर्ण करू.
उत्कृष्ट छपाई, साजेसे मुखपृष्ठ अगदी कमी वेळेत व अगदी बिनचूक.
मग वाट कसली बघता तुमचे स्वप्न पूर्ण करा ज्योतिर्मय प्रकाशन सोबत.
लगेच कामाला लागा व आम्हाला खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करा.
ज्योतिर्मय प्रकाशन
▪ पुणे ▪ छ. संभाजीनगर
संपर्क : 7743 81 8559
ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ




6 व्या वर्धापनदिनानिमित्त "EVENT क्षेत्राचे दालन"
आपल्यासाठी नव्या उत्साहाने खुले होत आहे...
नव्या संकल्पांसह, नव्या उंचींकडे वाटचाल करण्यासाठी!
ब्रह्मसखी EVENT MANAGEMENT
विश्वासाच्या सहा वर्षांनंतर...आता नात्यांसोबत विवाहाचं सुंदर नियोजनही!
मराठवाड्यातून सुरुवात. परिपूर्णतेकडे वाटचाल.
संपर्क:
+91 9049009474 | +91 9049009475
+91 9049009476 | +91 9049009477

दुकान भाड्याने देणे आहे.
300 स्वेअर फूट दुकान भाड्याने देणे आहे.
डॉक्टरांना प्राधान्य.
इंदुगंगा आर्केड,
राहुल मेडिकलच्या बाजूला,
क्रिकेट स्टेडियम जवळ,
एन 2, मेन रोड,
सिडको छ. संभाजीनगर
संपर्क :
9823195585/ 8149998143

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# एक श्रेष्ठ साहित्यिक, लोकप्रिय कवी : श्री विजय सातपुते

**ज्योतिर्मय साहित्य**

एखादया क्षेत्रात काही व्यक्ती विलक्षण प्रभावी असतात.ते सतत कार्यरत राहून, स्वतःचा छंद जपत असतात.आपला छंद जपता जपतात्यातून तन्मयतेने अविरतपणे समाजाला प्रबोधन करण्याचे कार्य करत असतात. अशीच एक व्यक्ती मला साहित्य क्षेत्रात पुणे येथे भेटली आणि हळूहळू आमची मैत्री झाली.त्यांची ओळख मी काय देऊ? त्यांचं अफाट लिखाणच त्यांची ओळख आहे.

बोलण्यात साधेपण, वागण्यात विनम्रता, सदैव इतरांच्या मदतीस तयार असणारी, ही व्यक्ती म्हणजे पुण्यातील एक अतिशय उत्कृष्ट, लोकप्रिय कवी, लेखक श्री विजय यशवंत सातपुते होत. अतिशय सहजतेने विविध प्रकारात काव्य रचणे, यात त्यांचा विशेष हातखंडा आहे. यात विशेष अश्या अध्यात्मिक कविता,आरत्या चारोळ्या, लावण्या, आदी प्रकार अतिशय उत्कटतेने लिहिणारे श्री विजय सातपुते सर शीघ्र कवी आहेत.

त्यांचा साहित्यिक परिचयप्रचंड मोठा आहे पण त्याला मी कमी शब्दात बसवण्याचा अनाहुत प्रयत्न करतो आहे.

साहित्यिकाचा परिचय :

नाव : कविराज विजय यशवंत सातपुते, पुणे

शिक्षण : वाणिज्य शाखा. पदवीधर.

व्यवसाय : अकौंट लेखन. नोकरी :- डिफेन्स अकौं. को ऑप. कन्झ्युमर सोसा. लि. टिळक रोड,पुणे येथे १९९३ ते २००९ पर्यंत कार्यरत. संध्या अकौंट रायटिंग. छंद, आवड : वाचन, लेखन, निवेदन, सूत्रसंचालन, कथा, कविता, साहित्य लेखन, मानपत्र, वृत्तपत्र स्तंभलेखन, प्रवास, फोटोग्राफी, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धा, उपक्रमांत प्रत्यक्ष सहभाग आणि संयोजन कार्यात तसेच विविध संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात कार्यरत रहाणे हे विशेष छंद

कार्य परीचय : १९८८ पासून अनेक दिवाळी अंक, नियतकालिकांतून, दैनिक वृत्तपत्रातून कथा, कविता, स्तंभलेखन, ललित साहित्य सातत्याने प्रकाशीत झाले आहे. महाराष्टातील साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक व्यासपीठावर प्रत्यक्ष सहभाग, कथा, काव्य सादरीकरण आणि काव्य परीक्षण. कवितेविषयक, साहित्यविषयक, तालुका, जिल्हा, राज्य, देश पातळीवरील अनेकविध उपक्रमात सहभागी झाले आहेत, होत असतात. अनेक साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन सातत्याने गेली तीस वर्षे अखंडपणे ते करत आहेत.

संविधान. काही रोचक पैलू या विषयावर चित्राधारीत व्याख्यान. शब्दसेतू साहित्य मंच पुणे या वॉटस अप समुहाचा संस्थापक अध्यक्ष., समरसता साहित्य परीषद महाराष्ट्र राज्य प्रदेश प्रांत निहाय कार्यकारिणीत पश्चिम महाराष्ट्र कार्यकारीणी प्रांत अध्यक्षपदी एकमताने निवड.

कालावधी (मार्च २०२४ ते



मार्च २०२७)

श्री विजय सातपुते सर यांना आजवर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. ते वाचतानाच वाचकांना त्यांच्या अफाट लिखाणाची प्रचिती येऊ शकेल.

त्यांना मिळालेले काही पुरस्कार :

कविराज पुरस्कार..१९९२, १९९२ मध्ये राज्य स्तरावरील काव्य स्पर्धेत मोरपीस या कवितेला प्रथम पारितोषिक व कै. वसंत बापट यांच्या हस्ते कविराज ही पदवी बहाल., काव्यरत्न पुरस्कार १९९३ सर्वोत्कृष्ट कवी१९९५. महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई २००१, छावा काव्य पुरस्कार २००३, अरण्येश्वर सांस्कृतिक पुरस्कार २००३, कुसुमाग्रज सांस्कृतिक पुरस्कार २००४, सर्वोत्कृष्ट कवी २००४ केशवसूत जन्मशताब्दी पुरस्कार २००५., प्रकाश यात्री पुरस्कार. २००६ बंधुता प्रतिष्ठान कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार २००६., संगमनेरकर इतिहास संशोधक मंडळ उत्कृष्ट साहित्यिक २००७, इचलकरंजी साहित्य पुरस्कार २००८, राष्ट्रीय एकात्मता फ ेलोशिप, राष्ट्रीय पुरस्कार २००८, शब्दसखा पुरस्कार २००९, काव्य ज्योत पुरस्कार २०११, समाज रत्न पुरस्कार २०१२, कालिदास साहित्य उपासक पुरस्कार प्राप्त २०१२ रंगदासस्वामी, शैक्षणिक, सामाजिक, संस्था, पिरंगुट नेताजी सुभाषचंद्र बोस पुरस्कार २०१२ साई प्रतिष्ठान, वडगांवशेरी समाजसेवा राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०१२, जयगुरूदत्त साहित्य सेवा गौरव पुरस्कार २०१२, दै. सकाळ कडून खरा पुणेकर किताब बहाल. पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ, देऊन शनिवार वाड्यावर जाहीर सत्कार. पुण्याच्या वैभवात भर घालणारी व्यक्ती, व सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, साहित्यिक, क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी व्यक्ती म्हणून महापौर पुणे यांच्या हस्ते २०१४, २०१५, २०१६, सलग तीन वर्षे सन्मान चिन्ह देऊन जाहीर सत्कार. अखिल भारतीय साहित्य संमेलनात दरवर्षी सहभाग.

कलर टिव्ही वरील कॉमेडीची बुलेट ट्रेन या कार्यक्रमात प्रेक्षक परिक्षक म्हणून सहभाग.

दूरदर्शन वरील अनेक चॅनेल वरून, आकाशवाणी वरून काव्य सादरीकरण, काव्य वाचन झाले आहे

दिनांक. २/२/२०२० रोजी समर्थ प्रतिष्ठान तर्फे महाराष्ट्र आयकॉन या राज्य स्तरीय




पुरस्काराने पुरस्कृत.

काव्यस्पंदन महाराष्ट्र भूषण अष्टपैलू कार्यगौरव पुरस्कार २०१९ प्राप्त हस्ते डॉ. श्रीपाल सबनीस

पोएट ऑफ दि इयर २०२० हा सन्मान प्राप्त.

साहित्य गौरव संमेलनात १८/१०/२०२० रोजी ऑनलाईन प्रदान करण्यात आला. साहित्य प्रज्ञा संमेलन आयोजित तिसरे मराठी साहित्य संमेलन कल्याण येथे १४/२/२०२१ रोजी साहित्य रत्न पुरस्कार, मराठी राजभाषा दिनी सुखकर्ता सांस्कृतिक प्रतिष्ठान तर्फे साहित्य गौरव पुरस्कार. हस्ते महेश वाबळे. स्थायी समिती सदस्य, पुणे मनपा. २७/२/२०२१ रोजी. साहित्यिक कोहिनूर हिरा पुरस्कार २०२१ सुखकर्ता पुरस्कार २०२१ माझी लेखणी समुह द्वारा प्राप्त. साहित्य संवर्धन पुरस्कार २०२२. फ ुलोरा साहित्य रत्न पुरस्कार २०२२, सृजनशील व्यक्तीत्व पुरस्कार १४ डिसेंबर २०२२, सुर्य गंध प्रकाशन व सप्तरंग अकादमी वतीने सुवर्ण महोत्सवी सत्कार समारंभ. आद्य कवी मुकुंदराज पुरस्कार २०२२ कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने.

आजवर श्री विजय सातपुते सरांनी ८५०० च्या वर ओवी, अभंग, कविता, चारोळ्या, स्फुट लेखन आदी प्रकारात शब्दांना गुंफले आहे, लिहिले आहे.

त्यांच्या त्यांना आवडत्या दोन कवितेच्या काही ओळी मी येथे देत आहे.

त्यांची एक कविता आहे
झुंबर माया ती अशी
झुंबर माया...!

अफ्रिकेतून, आली पाहुणी
दाट सावली, देते सकला
इवली पाने, जाड डहाळी
हळू वाढते, चिंच सुफला.

नाव काढता, मुखात पाणी
गुज गोष्टींची, चिंच शिदोरी
आहे विदेशी, ही वनराणी
हीची नसे रे, दृष्टी अघोरी.

ही सुंदर कविता वाचूनच वाचकाला चिंच खाण्याची लहर न आली तरच नवल.

त्यांची दुसरी एक कविता अशीच सुंदर आहे
एकटेपण...!

पानपान आयुष्याचं
जेव्हा लागतं बोलायला
अडेलतट्टू खट्याळ मन
हळूच लागतं डोलायला...!

आयुष्याच्या पानांना त्या
आपणच देतो रंगरूप
वाचता वाचता शब्दांमधून
दरवळत जातो जीवन धूप..!

पान असतं मित्रा सारखं
कधी पचतं,रुचतं, भावतं
तर कधी गैरसमजानं
रुसतं,फुगतं, नी दुरावतं..!


जा मित्रा मजा कर
आजचा दिवस तुझा आहे
आलीच माझी आठवण तर
रूमाल खिश्यात माझा आहे..!

उभ्या आडव्या रेषांतले
चौकोन कधीच आपले नसतात
चार कोन स्वभावाचे
आपल्याशीच नातं सांगतात.

अतिशय अर्थपूर्ण अशी ही कविता आहे. तर अशा या थोर साहित्यिकाला मानाचा मुजरा

***

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे



**ज्योतिर्मय साहित्य**

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले.

मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# शिवरात्री निमित्त दोनशे किलो सफरचंदची आरास !!

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे ८ फूट बाय ८ फुट महादेव पिंडीची आरास कुलस्वामिनी मंगल कार्यालय येथे करण्यात आली आहे.

ही आरास २०० किलो सफरचंद वापरण्यात येऊन त्या द्वारे ४ फुटी शिव पिंड, ११ कलश, स्वस्तिक,ओम् व पुष्प आणि बेल व बेल फळ आदीने सुंदर सजावट करण्यात आली.

जवळपास ६०० भक्तांनी दर्शन घेतले. ही फळे भक्तांना प्रसाद म्हणुन वाटण्यात आली. ही सजावट प्रतिष्ठान अध्यक्ष विलास कोरडे,अलका कोरडे,अविराज कोरडे,प्रलाद गायकवाड, अनिल गावंडे , राहुल नावकर यांनी केली.




# स्त्री सक्षमीकरण काळाची गरज - श्री राजेश गवळी

**ज्योतिर्मय साहित्य**

नरसापूर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ‘‘निर्भय कन्या अभियान’’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महिला सक्षमीकरण, स्वसंरक्षण, कायदेविषयक जाणीव आणि आरोग्य जागरूकता या उद्देशाने आयोजित या उपक्रमास विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या हस्ते उद्घाटनाने झाली. आपल्या मनोगतात त्यांनी मुलींनी शिक्षणासोबत स्वसंरक्षण व कायदेविषयक ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

पहिल्या सत्रात पुणे येथील कराटे अँड स्पोर्ट चॅम्पियन अकॅडमीच्या प्रशिक्षकांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. श्री. प्रदीप वाघोले व त्यांच्या सहकाऱ्यांनी लाठी-काठीचा वापर करून तसेच कोणतेही शस्त्र नसताना हल्लेखोरापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थिनींनीही प्रत्यक्ष सहभाग घेत विविध तंत्रांचा सराव केला.

दुसऱ्या सत्रात राजगड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेश गवळी यांनी महिलांसाठी असलेल्या कायद्यांची माहिती दिली. सायबर गुन्हे, छेडछाड प्रतिबंधक कायदे आणि तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात नसरापूर येथील शिंदे हॉस्पिटलच्या डॉ. अनुजा दांडेकर-शिंदे यांनी मुलींच्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. पोषण, स्वच्छता, मासिक पाळीतील काळजी आणि मानसिक आरोग्य यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रात भोर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. सुरेश शिंदे यांनी महिलांच्या हक्कांसंदर्भातील विविध कायदे व तरतुदी स्पष्ट केल्या. अन्यायाविरुद्ध कायदेशीर लढा कसा द्यावा याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सांगता सायंकाळी ४.३० वाजता करण्यात आली. या वेळी विद्यार्थी विकास मंडळाचे सदस्य, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. ‘‘निर्भय कन्या अभियान’’ या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सजगता व स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण झाली असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559